# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५७८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–११/०९/२०१६

**१) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एक जखमी . :–**

दिनांक ०९/०९/२०१६ रोजी २२.३० वा. दर. यातील फिर्यादी हा आरोपीचे मोटार सायकल क्र. एमएच ३६/८९४८ वर मागे डबल सिट बसुन दांडेगाव फाटा कडुन लाखांदुर कडे परत येत असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व निष्काळजीपणे भरधाव वेगाने चालवुन सार्वजनिक बांधकाम विभागाचा सिमेंट कांक्रेटच्या फलकाला धडक देवुन आरोपी मोटार सायकल चालक हा स्वत:च्या मरणास व मागे बसलेला फिर्यादी यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी शेषराव राजाराम कांबळे वय ३० वर्ष रा. लाखांदुर जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३०४(अ),२७९,३३७ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निंबेकर पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरून मारहाण करून, शिविगाळ व जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १०/०९/२०१६ रोजी ०६.३० ते ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी सुर्यकांत यशवंत रूद्रकार वय ३१ वर्ष रा. डोंगरगाव हा आपले वडीलासह म्हशी बांधण्याच्या प्लॉट वर शेनपुंजा करीत असता आरोपी क्र. १ याने सांडपाणी वाहात असलेल्या ठिकानी रेती घालुन शिविगाळ करीत असता फिर्यादीने त्यास शिविगाळ कशाला करता असे म्हटले असता आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमत करून फिर्यादीचे कॉलर पकडुन जांबाझोंबी करून खाली पाडले व आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे छातीला चावा घेवुन जखमी केले व फिर्यादीचे वडील भांडण सोडविण्यास आले असता आरोपी क्र. ३ व ४ यांनी त्याला मारपिट करून शिविगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाभरे पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलने धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०९/०९/२०१६ रोजी १७.०० वा. दर. यातील जखमी नापोशि. रविंद्र गभने स्था.गु.शा. भंडारा हा कार्यालयातुन त्रिमुर्ती चौका कडुन मुस्लीम लायब्ररी चौक कडे आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ३३५५ ने जात असतांना भुमीअभीलेख कार्यालयासमोर यातील आरोपी मुस्लीम समाजाचे बुलेट चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व लापरवाहीने चालवुन जखमीचे मोटार सायकल ला धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. पुराम व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

४)अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक ०१०/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, तुमसर, आंधळगाव, गोबरवाही, साकोली, लाखनी, अडयाळ, व लाखांदुर येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ९५ लिटर हातभट्टी दारू कि. ५,३५०/–रू. व ४ लिटर १४० मिली देशी दारू कि. १,२००/–रू. तसेच जुगारातुन कि. ३७३/–रू. असा एकुण ६,९२३/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

प्रभारी पोलीस अधिकारी
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६१९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.